# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यात खाजगी लॅब धारकांनी RT-PCR चाचणीचे जादा दर आकारल्याबाबत

**(१) ४८१६ (१७-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ संक्रमण काळामध्ये आर.टी.पी.सी.आर. अँटीजन, रक्त तपासणी चाचण्या कोरोना संसर्गाच्या निदानासाठी वापरल्या जात असताना शहरात अनेक ठिकाणी कोणतीही नोंदणी नसलेल्या वैद्यकीय प्रयोगशाळा सुरु झाल्याचे तसेच एम.डी. पॅथॉलॉजीस्ट एकाच वेळी अनेक ठिकाणी स्वाक्षरी करुन प्रत्येक अहवालामागे दर आकारणी करुन सर्वसामान्यांची लूट करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक रुग्णालयातून निलंबन झालेल्या रक्त संक्रमण अधिकारी मुंबई वगळता अनेक ठिकाणी वैद्यकीय तपासण्यांच्या अहवालांवर स्वाक्षरी करताना आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात ज्या समितीने आर.टी.पी.सी.आर. चाचणीचे वाढीव दर मंजूर केले त्यांच्यावर कारवाई करून खाजगी लॅबधारकांनी अतिरिक्त आकारणी केलेले पैसे वसूल करावे अशी विनंती मा.विरोधी पक्षनेते, विधान परिषद यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये केली असून या पत्रावर कार्यवाही न करता रुपये १४८ मध्ये आर.टी.पी.सी.आर. चाचणी करणे शक्य असल्याचा खुलासा मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी लॅबधारकांनी रुपये १४८ खर्च असणाऱ्या चाचणीचे रुग्णांकडून १६०० ते २५०० रुपये आकारले असून एच.एल.एल. लाईफ केअरने रुपये ७९६ मध्ये आर.टी.पी.सी.आर. चाचणी करण्याची तयारी दाखविली असताना, त्याच दरात खाजगी लॅब धारकांना चाचणी करुन देण्याचे बंधन न घातल्याने, रुग्णांचे रुपये २७० कोटी एवढा जादा खर्च झाल्याने नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जादा दर निश्चित करणाऱ्या आणि आकारणाऱ्या समिती व खाजगी प्रयोगशाळांविरुध्द कारवाई करुन औषधांच्या दुकानांमधील फार्मासिस्टप्रमाणे पॅथॉलॉजीस्टनाही एकाहून अधिक ठिकाणी स्वाक्षरी करण्यास बंदी घालण्यासंबंधी नियमावली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०९-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लोकमान्य टिळक रूग्णालयातील रक्त संक्रमण अधिकाऱ्याविरोधात तक्रार प्राप्त झाली असून सदर अधिकाऱ्याविरुध्द सर्वंकष खात्यांतर्गत चौकशी करण्यात आली आहे.
(३) राज्यातील आर.टी.पी.सी.आर. चाचणीची दर निश्चिती ही खाजगी लॅब साठी असून खाजगी लॅब मध्ये चाचणी करणाऱ्या रुग्णांसाठीची आहे. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये आर.टी.पी.सी.आर. चाचणी मोफत उपलब्ध आहे. तसेच रुपये १४८/- हा खर्च हाफकिन मार्फत राज्यासाठी एकत्रित खरेदी केलेल्या आर.टी.पी.सी.आर. चाचणीसाठी लागणाऱ्या फक्त किट्सचा आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

मे.एच.एल.एल. लाईफ केअर लि. यांचे रुपये ७९६/- प्रती आर.टी.पी.सी.आर. चाचणी, हे दर फ्री डायग्नोस्टिक योजनेंतर्गत समाविष्ट सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य संस्थांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांच्या चाचण्या करण्यासाठीच लागू आहेत. खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या किंवा खाजगी प्रयोगशाळेमध्ये चाचणी करणाऱ्या रुग्णांसाठी हे दर लागू नाहीत. त्यामुळे एच.एल.एल. च्या दराची खाजगी प्रयोगशाळेच्या दरांशी तुलना करुन खाजगी प्रयोगशाळामध्ये चाचणी केलेल्या रुग्णांचे रुपये २७०/- कोटी जादा खर्च झाले, हे म्हणणे वस्तुस्थितीस धरुन नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सफाळे आणि पालघर (ता.जि.पालघर) येथील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून सदर रस्त्यांवरील अवजड वाहनांची वाहतूक रोखण्याबाबत

**(२) १८७९६ (२०-०६-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सफाळे आणि पालघर (ता.जि.पालघर) येथे सुरु असलेल्या विविध राष्ट्रीय प्रकल्पांच्या कामांसाठी मुरूममाती आणि गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या ठेकेदार कंपनीच्या अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे या दोन्ही तालुक्यांतील ग्रामीण भागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केवळ आठ ते दहा टन भार पेलण्याची क्षमता असलेल्या पालघर जिल्ह्यांतील विविध ग्रामीण भागातील रस्त्यांवर ३० ते ४० टन वजनी वाहनांची सातत्याने वर्दळ सुरु असल्याने रस्ते नादुरुस्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सफाळे व पालघर (ता.जि.पालघर) येथील नादुरुस्त झालेल्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्यासह सदर रस्त्यांवरील अवजड वाहनांची वाहतूक रोखण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०८-०९-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) पालघर जिल्ह्यातील सफाळे व पालघर परिसरामध्ये बडोदा एक्सप्रेस कॉरिडॉर या राष्ट्रीय प्रकल्पाचे काम सुरु आहे. सदर प्रकल्पांच्या कामामुळे उक्त परिसरातील एकूण २५ ग्रामीण व अवर्गीकृत रस्ते क्षतिग्रस्त झाले असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

सदर रस्त्यांपैकी इजिमा-६१ या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ अंतर्गत रुपये १०.३७ कोटी रकमेचे काम मंजूर आहे. अन्य क्षतिग्रस्त रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता संबंधित राष्ट्रीय प्रकल्पांचे काम सुरु असलेल्या कंपनीचे प्रतिनिधींसमवेत विचारविनिमय करुन प्रकल्पामुळे क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत तात्काळ कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषदेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरात सुरू असलेल्या चंदन झाडांच्या तस्करीबाबत

**(३) २११११ (०४-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात गत वर्षात चंदनाच्या झाडांची चोरी होत असलेल्या २५ घटना घडल्याची बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंदनांच्या झाडांची चोरी करून कर्नाटक आणि आंध्रप्रदेशमध्ये तस्करी करणाऱ्या टोळया पुणे शहरामध्ये सक्रिय झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि पुणे शहरातील चंदनाच्या लाकडांची तस्करी थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०२४) :** (१) पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये चंदनाच्या झाडांच्या चोरीबाबत सन २०२२-२०२३ मध्ये एकूण ४८ गुन्ह्यांची नोंद करण्यात आलेली आहे.
(२) नाही.
(३) चंदन चोरीबाबत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून १५ दोषारोपपत्र मा.न्यायालयामध्ये सादर करण्यात आले असून उर्वरित ३३ गुन्ह्यांवर तपास सुरु आहे. तसेच चंदन चोरीबाबत आळा बसविण्याकरीता पुणे पोलीस दलामार्फत १) रात्रीची नाकाबंदी वाढविणे २) रात्र गस्त वाढविणे ३) कोंबींग ऑपरेशन यासारख्या उपाययोजना करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंठा ग्रामीण रुग्णालय (जि.जालना) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत

**(४) २१४१३ (०५-०१-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा ग्रामीण रुग्णालय (जि.जालना) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत स्थानिक जनतेतून मागणी होत असून नवीन रुग्णालय इमारतीचा प्रस्ताव अद्यापही शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या श्रेणीत वाढ करण्याची व कर्मचाऱ्यांना निवासस्थानाची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंठा ग्रामीण रुग्णालय (जि.जालना) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत तसेच ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या श्रेणीत वाढ करण्याची व कर्मचाऱ्यांना निवासस्थानाची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मंठा, जि.जालना येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धनास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या मुख्य इमारत बांधकामाचे रुपये २७१०.०० लक्ष इतक्या रकमेस शासन निर्णय २६/०७/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यासह राज्यात क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(५) २१६०७ (०५-०१-२०२४) श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्षयरोग निर्मुलनासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध उपक्रम राबविण्यात येत असतानाच राज्यासह पुणे जिल्ह्यामध्ये क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा जाणवत असून रुग्णांनाही उपचार सुरु ठेवण्यास अडचणी येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महानगरपालिका आणि ग्रामीण रुग्णालयांना स्थानिक पातळीवर औषधांची खरेदी करावी लागली असून औषधांची वेळेवर उपलब्धता न झाल्याने रुग्णांच्या उपचार प्रक्रियेवर याचा गंभीर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासानाने चौकशी करुन क्षयरोगाचे रुग्ण वाढत असताना दुसरीकडे औषधांचा तुटवडा निर्माण होण्याची कारणे काय आहेत याचा आढावा घेऊन रुग्णांना तातडीने औषधे उपलब्ध व्हावीत याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) पुणे सह राज्यात भारत सरकारच्या केंद्रीय क्षयरोग विभागाकडून टीबीविरोधी औषधे मिळतात. कोणत्याही कारणास्तव औषधांचा तुटवडा असल्यास केंद्रीय क्षयरोग विभाग राज्य क्षयरोग कार्यालयाला परवानगी देते आणि सर्व जिल्हा क्षयरोग अधिकारी व शहर क्षयरोग अधिकारी यांना राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत अनुदान वाटप करण्यात येते. राज्यात काही काळ औषध प्रतिरोधी रुग्णांसाठी (MDR रुग्ण) आवश्यक असणाऱ्या ठराविक काही औषधांचा (Cap. Clofazimine, Cap. Cycloserine, Tab Linezolid) पुरवठा केंद्रीय क्षयरोग विभागाद्वारे उशिरा प्राप्त होत होता.यास्तव सर्व जिल्हा व शहर क्षयरोग अधिकारी यांना स्थानिक पातळीवर खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली. त्यानुसार जिल्हा क्षयरोग अधिकारी यांनी स्थानिक पातळीवर औषधांची खरेदी करुन रुग्णांना वेळेत औषधांचा पुरवठा केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात मेट्रो प्रवाशांकरीता सर्व मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) २१७३९ (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पुणे शहराचा विस्तार वाढला असून शहरातील पायाभूत सुविधा मजबूत केल्या जात असतानाच पुणे शहरात मेट्रो सुरु झाली, परंतु अद्याप बऱ्याच ठिकाणी पुणे शहरातील मेट्रो स्थानकात प्रवाशांना प्रवेश व पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास प्रवाशांसाठी असणाऱ्या सर्व मूलभूत सेवा सुविधा पुरविण्यासाठी तसेच दिव्यांग प्रवाशांना आवश्यक सुविधा देणे, दिशादर्शक फलक, एक्सलेटर, शौचालय, पार्किंग व्यवस्था, बस स्टॉप ऑटो स्टॅन्ड, सुरक्षा रक्षक या सुविधांसह इतर सर्व सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) पुणे मेट्रो प्रकल्पाच्या सर्व स्थानकांवर प्रवाशांसाठी दिशादर्शक फलक, एक्सलेटर, शौचालय, बस स्टॉप, ऑटो स्टॅन्ड व सुरक्षा रक्षक इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच काही

स्थानकांजवळ महामेट्रोच्या जमिनीवर प्रवाशांसाठी पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. उर्वरित स्थानकांवर पार्किंगसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी पुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु आहे.

---

## नागपूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांना निवड श्रेणी लागू करण्याबाबत

**(७) २१९०१ (०५-०१-२०२४) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांना ५६ वर्षांपासून निवड श्रेणी लागू करण्यात आली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवड श्रेणी लागू करणे, सेवानिवृत्त शिक्षकांनी सन २०२१ पासून विकलेल्या निवृत्तीवेतनाचे अंशदान आणि योगदान देणे, प्राथमिक शिक्षकांना सातवा वेतन आयोगाचे हप्ते वितरित करणे, गट विम्याची रक्कम सेवानिवृत्तीनंतर तातडीने मिळते ही रक्कम सुद्धा सन २०१८ पासून प्रलंबित असणे, मासिक निवृत्तीवेतन दर महिन्याच्या एक तारखेला देणे, अशा विविध मागण्या जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडे सेवानिवृत्त शिक्षकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-०५-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी आयोजित केलेल्या तक्रार निवारण सभेमध्ये शिक्षक संघटना व विविध शिक्षक संघटना यांनी अशा विविध मागण्या मौखिकरित्या उपस्थित केलेल्या आहेत.

दिनांक ३१/१२/१९६७ पर्यंत नियुक्त प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीतील २०% प्रमाणे सेवा ज्येष्ठतेनुसार निवड श्रेणी लागु करण्यात आली आहे. तसेच दिनांक ०१/०१/१९६८ नंतर नियुक्त प्राथमिक शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीतील २०% प्रमाणे सेवाजेष्ठतेनुसार निवडश्रेणी लागु करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे.

सेवानिवृत्त शिक्षकांचे उपदान व अंशराशीकरण माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत व ७ वे वेतन आयोगाचा १,२,३ हप्ता अदा करण्यात आला आहे. माहे नोव्हेंबर, २०२२ पासून अनुदाना अभावि प्रलंबित आहे.

गट विमा सन २०१८ ते २०२१ पर्यंतचे प्रस्ताव वेळोवेळी शासनाकडून प्राप्त दरपत्रकानुसार त्वरीत कार्यवाही करुन वित्त विभागास सादर करण्यात आलेले होते. वित्त विभागाकडून सदर गट विमा देयकाला एक वर्षाचे वर कालावधी झाल्याने सन २०२३ मध्ये सन २०१८ ते २०२१ पर्यंत प्रस्ताव सुधारित आदेश जोडून सादर करण्याकरीता तसेच २०४/- व ४८०/- कपाती बाबत आक्षेप नोंदवून आक्षेपांची पूर्तता करण्याकरीता परत करण्यात आले. सदर देयकावरील आक्षेपांची पुर्तता करुन गट विमा देयके पुन:श्च मंजूरी करीता वित्त विभागास सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

सेवानिवृत्त शिक्षकांची मासिक पेन्शन दर महिन्याला १ तारखेला करण्यासंबंधाने कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील कुरुम प्राथमिक आरोग्य केंद्राला दान दिलेल्या ४७ एकर जमिनीचे उत्पन्न मिळत नसल्याबाबत

**(८) २१९३५ (०५-०१-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील कुरुम प्राथमिक आरोग्य केंद्राचे (पी.एच.सी.) आर्थिक उत्पन्न वाढावे या दृष्टीने कै.गरजाबाई सारडा यांनी ४७ एकर शेतजमीन सदर आरोग्य केंद्राला दान दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमीन गेल्या चार वर्षांपासून दुसरी व्यक्ती कसण्याचे काम करत असून त्याचे उत्पन्न प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळत नसल्याने याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात आवश्यक कार्यवाही करुन संबंधित शेतजमिनीतील पिकाचे उत्पन्न प्राथमिक आरोग्य केंद्राला मिळावे यासाठी कार्यवाही करावी अशी सूचना जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सभेत सत्तापक्षाच्या गटनेत्यांकडून उपस्थित करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२२-०३-२०२४) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली असून जिल्हा परिषद, अकोला आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र कुरुम स्तरावर जाहीर लिलाव करुन रुपये ८ लक्ष ६२ हजार ४०० रुपये मध्ये जमीन लागवडीकरीता दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत देण्यात आली आहे व त्याची रक्कम प्रा.आ.केंद्र कुरुमचे खातेमध्ये जमा करण्यात आली.

तत्पूर्वी वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र कुरुम यांनी दिनांक ११/१०/२०२३ रोजी ठाणेदार, पोलीस स्टेशन माना येथे अज्ञात व्यक्तीचे नावे विना परवानगीने जमीन वहीत करुन पेरले त्याबाबत चौकशी करण्याचे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा परिषद पॅनलवरील विधिज्ञ यांचे मार्फत श्री.सुरेश नंदलालजी मालाणी यांना मागील तीन वर्षाचे उत्पन्न जे प्राथमिक आरोग्य केंद्रास मिळाले नाही ते अतिरिक्त व्याजासह रुपये ३१ लक्ष ८६ हजार देण्यात यावे असे नोटीस दिनांक ०३/११/२०२३ ला देण्यात आली. श्री.सुरेश नंदलालजी मालाणी यांचे नावे मा.ठाणेदार, पोलीस स्टेशन, माना यांचेकडे कायदेशिर कार्यवाही करण्याबाबत दिनांक २१/११/२०२३ रोजी लेखी तक्रार दाखल केली. परंतु श्री. मालाणी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने प्रशासनाच्यावतीने मा.दिवाणी न्यायालय अकोला येथे वसुलीसंदर्भात दावा दाखल केलेला आहे. करीता मा.न्यायालय मार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वैदयकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची नोंदणी महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिलने करण्याबाबत

**(९) २२०२८ (०५-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४ पासून आतापर्यंत दीड लाखाहून अधिक विद्यार्थी वैदयकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रमात उत्तीर्ण झाले असून महाराष्ट्र पॅरामेडिकल कॉन्सिलने अद्यापही या विद्यार्थ्यांची नोंदणी न केल्याने हे विद्यार्थी बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहिती व निर्णय घेवून वैदयकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान शिक्षण अभ्यासक्रमात उत्तीर्ण विद्यार्थ्यांची नोंदणी महाराष्ट्र पॅरामेडिकल कॉन्सिलने करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील केंद्र प्रमुखांना वेतनवाढीची अट रद्द करण्याबाबत

**(१०) २२१२२ (०५-०१-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास उप सचिवांनी दिनांक २६ सप्टेंबर, २०२३ रोजी आदेश काढून केंद्र प्रमुखांना वेतनवाढ ही शासन निर्णय प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून लागू राहणार असल्याचे म्हटले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही अट रद्द करून केंद्र प्रमुख पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून पदोन्नतीची वेतनवाढ देण्याची मागणी बुलढाणा जिल्हा सेवानिवृत्त कल्याणकारी संस्थेच्यावतीने तसेच राज्यातील इतर केंद्र प्रमुख यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदरहू मागणी संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१४-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक २६/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ येथील "सदर शासन निर्णय, शासन निर्णय प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील" ही अट रद्द करुन शासन निर्णयात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनावर येणाऱ्या आर्थिक भाराची परिगणना करण्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांचेकडून माहिती मागविण्यात आली आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आरोग्यसेवांचा सुधारित आराखडा निश्चित करणेबाबत

**(११) २२२१२ (०५-०१-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या आरोग्य सेवेचा आराखडा १९८१ ची लोकसंख्या गृहित धरुन निश्चित करण्यात आला असून ४० वर्षापूर्वीच्या लोकसंख्येनुसार २०२३ मध्ये ही आरोग्य संस्थांची निर्मिती व कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढत्या लोकसंख्येनुसार आरोग्य संस्थांची निर्मिती करणे व कर्मचाऱ्यांची भरती करणे यासाठी सन २०१३ साली शासनाने सुधारित आराखडा जाहीर केला मात्र १० वर्षानंतरही या आराखड्यानुसार आरोग्य संस्था वाढवण्यात आलेल्या नसून त्यानुसार कर्मचाऱ्यांची भरती ही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१३ साली प्रत्येकी ३० खाटांच्या ४७ ग्रामीण रुग्णालयांना मान्यता देण्यात आली होती परंतु त्यापैकी बहुतांश रुग्णालयांचे काम अद्यापही झालेले नाही तर काही ठिकाणी इमारती झाल्या पण त्यांचे लोकार्पण झाले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरेआहे काय,
(४) असल्यास, वाढत्या लोकसंख्येनुसार आरोग्यसेवेचा विस्तार करण्यासाठी नव्याने सुधारित आराखडा निश्चित करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(५) असल्यास, वाढत्या लोकसंख्येनुसार आरोग्यसेवेचा विस्तार करण्यासाठी नव्याने सुधारित आराखडा निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यत येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत काय ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०९-२०२४) :** (१) हे खरे नाही.
सन २०११ च्या लोकसंख्येनुसार निकष ग्राहय धरुन आरोग्य संस्थांची निर्मिती करुन पदभरती करण्यात येते.
(२) सन २०१३ च्या बृहत आराखड्यानुसार सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत आरोग्य संस्था स्थापन करण्याबाबत तसेच आरोग्य संस्थांची भौगोलिक परिस्थिती व मा.लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन आरोग्य संस्थांची स्थापना करण्यात येते.
सदर मंजूर झालेल्या आरोग्य संस्थांचे बांधकाम ७५ टक्के पेक्षा जास्त झाले असल्यास पदनिर्मिती व पदभरती करण्यात येते.
(३) शासन निर्णय दिनांक १७/०१/२०१३ नुसार बृहत आराखड्यामध्ये ४७ ग्रामीण रुग्णालये मंजूर करण्यात आली असून त्यापैकी १५ ठिकाणचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. २० ठिकाणचे बांधकाम प्रगतीपथावर असून १२ ठिकाणचे बांधकाम सुरु करण्यासाठीची कार्यवाही संबंधित जिल्हा स्तरावर सुरु आहे.

(४) नव्याने सुधारित वृहत आराखडा निश्चित करण्यासाठी MRSAC संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर संस्थेने ठरविलेल्या निकषानुसार राज्यातील सर्व जिल्ह्याकडुन प्रस्तावित आरोग्य संस्थांची छाननी करुन आरोग्य संस्था अंतिम करण्यात येतील.
(५) शासन पत्र दिनांक ११ जुलै, २०२४ अन्वये आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडून नव्याने सुधारित बृहत आराखडा निश्चित करण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रांसह त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव फेर सादर करण्यास कळविण्यात आले आहे.

---

## चंद्रपूर जिल्ह्यामध्ये वेकोलीचे अनेक भूमिगत व खुल्या कोळसा खाणींमध्ये स्थानिकांऐवजी परप्रांतीय कामगारांना कामावर घेतल्याबाबत

**(१२) २२३१७ (१९-०४-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यामध्ये वेकोलीचे अनेक भूमिगत व खुल्या कोळसा खाणी असून या खाणींमध्ये कंत्राटदाराला काम मिळताच परप्रांतीय कामगारांना बोलवून कामावर रुजू करण्यात येत असल्याने स्थानिक कामगारांना काम मिळत नसल्यामुळे बेकारी वाढत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेकोली कोळसा खाणीच्या प्रशासनासोबत कामगार विभागाने तातडीने लक्ष घालून राज्यातील कामगारांना काम मिळवून देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०९-२०२४) :** (१) नाही.

याबाबत जिल्हा कार्यालय, विभागीय कार्यालय अथवा उद्योग संचालनालयात कोणतेही निवेदन अथवा पत्र प्राप्त झालेले नाही.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांच्या चंद्रपूर, बल्लारपूर व मांजरी येथे कोलमाईन्स असून त्यामध्ये एकूण १४३६२ रोजगार निर्मिती झाली आहे. यामध्ये स्थानिक लोकांना रोजगार यांचे प्रमाण ८२ टक्के एवढे आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या निवासी डॉक्टरांना मानधनातील थकीत रक्कम मिळण्याबाबत

**(१३) २२३८२ (१९-०४-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सन २०१९ ते २०२२ या वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या बंधपात्रित १८० निवासी डॉक्टरांना त्यांच्या मानधनातील थकीत रक्कम मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक १ जुलै, २०१८ रोजी सर्व पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढवून देण्याची अधिसूचना निर्गमित केली असून सदर नियमानुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी निर्देश देऊनही सदर रुग्णालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना ३ कोटी ६० लाख रुपये ची थकीत रक्कम देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर १८० निवासी डॉक्टरांना मानधनातील थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच याबाबत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०१९-२०२१ या कालावधीमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथील निवासी डॉक्टरांना महागाई भत्त्यातील वाढीव फरकाची रक्कम अदा करण्याकरीता डिसेंबर, २०२३ हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती. सदर पुरवणी मागणीव्दारे मंजूर अनुदानातून उपरोक्त निवासी डॉक्टरांना महागाई भत्त्यातील वाढीव फरकाची रक्कम पूर्णत: अदा करण्यात आली आहे.

तसेच, सन २०२२ पासून निवासी डॉक्टरांना महागाई भत्त्याच्या वाढीसहीत विद्यावेतन नियमितपणे अदा करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नद्यांमधील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१४) २२९७२ (३०-०५-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्फत राष्ट्रीय जलस्तर निरीक्षण कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या तपासणीत राज्यातील ५३ नद्या प्रदूषित असल्याची बाब निदर्शनास आली असून वातावरणीय बदल, कमी पाऊस, मानवनिर्मित प्रदूषण, सांडपाणी, उद्योगांमधील प्रक्रिया न केलेले रासायनिक पाणी, जलपर्णी इत्यादी कारणांमुळे नागरिकांचे व जलचरांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योगांमध्ये प्रदूषण नियंत्रण यंत्रणा नसल्याचे तसेच प्रदूषण नियंत्रण उपायांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५% रकमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ठेवण्याचे निर्देश हरित लवादाने दिले असताना त्याची अंमलबजावणी प्रभावी पध्दतीने होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राज्यातील नदी पट्ट्यांचे प्रदूषण कमी करण्याकरीता प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आले आहेत. सदर कृती आराखड्यांची अंमलबजावणी विविध विभागांमार्फत करण्यात येत आहे.

- मा.हरित लवादाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रदूषित नदी पट्ट्यांमध्ये प्रदूषण रोखण्याकरीता स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दलाची स्थापना प्रदूषित नदी पट्टे असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे.
- राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ % रकमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधून निर्माण होणाऱ्या व विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
- औद्योगिक कारखान्यांना नदीमध्ये अप्रक्रियाकृत सांडपाणी सोडण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या अंमलबजावणी धोरणानुसार प्रदूषणकारी उद्योगांवर कारवाई करण्यात येते.
- उद्योगांमधून निर्माण रासायनिक सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित उद्योगांवर जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देण्याबाबत

**(१५) २३०४२ (२२-०७-२०२४) श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, प्रा.राम शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार ज्यांची जाहिरात १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी प्रकाशित झाली व नियुक्ती १ नोव्हेंबर, २००५ नंतर झाली अशांना जुनी निवृत्तीवेतन योजनेचा लाभ दिला असून या आधारे जे कर्मचारी १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित शाळेत सेवेत रुजू झाले त्यांना जुनी निवृत्तीवेतन योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देण्याचे मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शासन निर्णयामध्ये केवळ शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरिक सेवा निवृत्ती नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण १९८४ व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निमशासकीय अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनाही हा निर्णय लागू करण्यासाठी शासन सदर निर्णयात सुधारणा करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत नियुक्त विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजनेचा लाभ देणेबाबत तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरिक सेवानिवृत्ती नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण १९८४ व सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१३-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) निमशासकीय अनुदानित संस्थांमध्ये कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्तिवेतन योजनेचा पर्याय मिळण्याबाबत विधानसभा तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने विधानसभेमध्ये दिनांक ०१/०७/२०२४ रोजी झालेल्या चर्चेनुसार ग्रामविकास विभागाकडून वित्त विभागाकडे प्राप्त जिल्हा परिषदेच्या प्रस्तावातील त्रुटी दूर केल्यानंतर आवश्यक ती सर्व कार्यवाही केली जाईल तसेच, ३ महिन्याच्या आत सरकार त्याबद्दलचा निर्णय घेईल, असे मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांनी नमूद केले आहे.
(५) शासन मान्यता व अनुदान प्राप्त ज्या शैक्षणिक संस्थांना १०० टक्के अनुदान दिले जाते त्यास अनुदानित संस्था असे संबोधले जाते असा निकाल मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. ८३८७/२०१३ च्या अनुषंगाने दिनांक ३०/०४/२०१९ रोजी दिला आहे. सदर निर्णयास मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले असल्याने सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनाथ बालसंकुलांना बालकांचे पालन पोषण अनुदान वितरीत करण्याबाबत

**(१६) २३३९० (२०-०७-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७० हजार अनाथ बालकांना वर्षभरापासून पालन पोषण अनुदान मिळाले नसल्याबाबतची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनाथ बालसंकुलांना सदर शासकीय निधी उपलब्ध झाला नसल्याने बालसंकुल चालकांची आणि तेथील बालकांची अवस्था दयनीय झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अनाथ बालसंकुलांना पालन पोषण अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२४-०९-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ सुधारीत अधिनियम, २०२१ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ नुसार काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी राज्यात कार्यरत असलेल्या स्वंयसेवी संस्थांना सन २०२३-२४ या वित्तीय वर्षामध्ये ८०% सहाय्यक अनुदान दिनांक ०७/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अदा करण्यात आले आहे.
(३) स्वयंसेवी संस्थांचे सन २०२३-२४ या वित्तीय वर्षामधील उर्वरित २०% सहाय्यक अनुदान अदा करण्याबाबतचा प्रस्ताव नियोजन आणि वित्त विभागाने उपस्थित केलेल्या त्रुटींच्या पुर्ततेसह फेरसादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत

**(१७) २३४८१ (३०-०५-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वास्तव्य असलेल्या घाटकोपर येथील चिराग नगर (मुंबई) येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करुन तेथील अण्णाभाऊ साठे यांच्या घरांचे जतन करुन त्यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचा निर्णय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने घेतला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी ३०५ कोटी ६२ लाख २९ हजार रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय स्मारक बांधले जाणार असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाने दिली असून याचा आराखडा शासनाने तयार केला आहे काय,
(३) असल्यास, या स्मारकाचे बांधकाम कधीपासून सुरू करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१), (२), (३) व (४) शासनाच्या दिनांक ११/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णया अन्वये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे वास्तव्याचे ठिकाण पत्राचाळ, चिरागनगर, घाटकोपर (प) येथे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याकरीता रुपये ३०५.६२ कोटी इतक्या अंदाजित रकमेस तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर कामाचे आराखडे व सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील पाम बीच मार्गावर नेरूळ परिसरातील पाणथळीच्या जमिनी निवासी संकुलासाठी खुल्या करण्यात येत असल्याबाबत

**(१८) २३५५२ (१८-०६-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईची फ्लेमिंगो सिटी अशी ओळख बनविणाऱ्या फ्लेमिंगो या प्रवासी पक्षाच्या अधिवास असलेले पाणथळ नष्ट करण्याचे काम नवी मुंबई महानगरपालिकेकडून होत असल्याने, या पाणथळीवर दरवर्षी हजारोच्या संख्येने येणाऱ्या फ्लेमिंगोचा अधिवास पूर्णपणे नष्ट होण्याची भीती पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील पाम बीच मार्गावर नेरूळ परिसरातील खाडीकिनारी नैसर्गिकरीत्या तयार झालेल्या पाणथळीच्या जमिनी निवासी संकुलासाठी खुल्या करण्याचा निर्णय नवी मुंबई महानगरपालिकेच्या अंतिम विकास आराखड्यात जाहीर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या पाणथळ जमिनीवर निवासी संकुले उभारू नयेत यासाठी कोणत्या मार्गदर्शक सूचना नवी मुंबई महानगरपालिकेला केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार विकास योजना तयार करण्यात येत असून नवी मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्राकरीता प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमांच्या कलम २६ अन्वये जनतेकडून सूचना/ हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे ही बाब खरी आहे.

तद्नंतर विहित कालावधीत प्राप्त झालेल्या सुचना व हरकतीवर वैधानिक कार्यवाही करुन प्रारुप विकास योजना शासनाच्या मंजुरीस्तव सादर केली आहे. सदरच्या प्रारुप विकास योजनेवर संचालक, नगर रचना यांचा अहवाल मागविण्यात आला असून त्याअनुषंगाने प्रारुप विकास योजना मंजुरीबाबतची पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे. अद्याप विकास योजनेस अंतिम मंजुरी देण्यात आलेली नाही.
(३) व (४) विकास योजना प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली नसल्याने अशी बाब नाही.

---

## मुंबईतील वाहनांची समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र मुंबई पार्कींग ॲथॉरिटी स्थापन करण्याबाबत

**(१९) २३६०९ (३०-०५-२०२४) श्री.सचिन अहिर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहनांची समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र मुंबई पार्कींग अथॉरिटी (एमपीए) स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेने दीड वर्षापूर्वी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे, तसेच दीड वर्षापासून सदर प्रस्तावावरील कार्यवाही प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रस्तावास विलंब करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली, तसेच स्वतंत्र मुंबई अथॉरिटी स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार मुंबई पार्कींग ऑथॉरिटी स्थापन करण्याकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मध्ये सुधारणा करण्यासाठी संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन याबाबतचा प्रस्ताव शासन निर्णयार्थ सादर करण्यासंदर्भातील अनुषंगिक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या गैरकारभाराची चौकशी करण्याबाबत

**(२०) २४२९२ (१७-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या ई-मेल प्रणालीच्या देखभाल दुरुस्तीची करणाऱ्या मे.क्लाऊड स्टेटस या कंपनीला महामंडळाने देयके न अदा केल्यामुळे दिनांक १४ ते १६ नोव्हेंबर, २०२३ दरम्यान कंपनीने आपले काम थांबविल्यामुळे शासनाच्या महाडीबीटी थेट लाभ हस्तांतरणाच्या योजना बंद पडल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे अनेक अतिमहत्वाच्या जबाबदाऱ्या असताना त्या गांभीर्यपूर्वक पार पाडल्या जात नसल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत शासनाच्या आपले सरकार पोर्टल करीता १२४ सेवा सदरील महामंडळाने अद्यापही अधिसूचित केलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माहिती व तंत्रज्ञान महामंडळाकडील जबाबदारी निश्चिती करुन ती प्रभावीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही,

महाडीबीटी पोर्टलच्या सर्व सेवा AWS क्लाऊड सर्व्हरवर होस्टेड असल्याने डीबीटी चा कुठल्याही सेवा बंद नव्हत्या.
(२) हे खरे नाही,

सर्व अनुप्रयोगांचे सर्व सर्व्हर आणि डेटाबेस सुरळीतपणे चालत आहेत.
(३) हे खरे नाही,

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१(३)(१) अन्वये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधीच्या आत, आणि त्यानंतर वेळोवेळी, ते पुरवीत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा या अधिनियमाखाली अधिसूचित करील. तसेच यात महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचा कुठलाही हस्तक्षेप नसतो.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर